# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.
फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९
ई-मेल- jtdirrom@gmail.com संकेतस्थळ - www.jdteromumbai.com


**कार्यालयीन आदेश**

क्र.४/विकामुं/तंशि/तांत्रिक-४/२०१५/२८८३
दिनांक 30 SEP 2016

विषय — **स्पेशल लिव पिटीशन क्रं.२४८९६/२०१६**
(अ.भा.तं.शि.प. विरुध्द पदमभूषण वसंतदादा प्रतिष्ठान)
पदमभूषण वसंतदादा पाटील प्रतिष्ठांनचे अभियांत्रिकी महाविद्यालय, सायन, मुंबई या संस्थेमध्ये शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मधील प्रथम वर्ष व थेट व्दित्तीय वर्षातील प्रवेशित विद्यार्थ्याचे संस्था स्थलांतर करण्याबाबत

संदर्भः- १. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे पत्र क्र.२०१-२०१/२०१६/४७०८२-८५ दि.२६.०९.२०१६
२. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र. २/एनजीसी/तक्रार/३१८८ संस्थाबदल/ २०१६/२०९६ दि.२६.०९.२०१६
३. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र. २/एनजीसी/तक्रार/३१८८ संस्थाबदल/ २०१६/२१०१ दि.२९.०९.२०१६

पदमभूषण वसंतदादा पाटील प्रतिष्ठांनचे अभियांत्रिकी महाविद्यालय, सायन, मुंबई या संस्थेमध्ये शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये केंद्रीभुत व संस्था स्तरावरील प्रवेश प्रक्रियेमार्फत प्रवेश दिलेल्या प्रवेशित विद्यार्थ्याचे संस्थास्थलांतर अ.भा.तं.परिषदेच्या संदर्भीय पत्रातील निर्देशानुसार इतर विनाअनुदानित संस्थेमध्ये करण्याबाबत तंत्रशिक्षण संचलनालयाचे वरील संदर्भ क्र. २ व ३ चे पत्रान्वये सुचित केलेले आहे.

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या निर्देशास अनुसरुन या कार्यालयाकडून पदमभूषण वसंतदादा पाटील प्रतिष्ठांनचे अभियांत्रिकी महाविद्यालय, सायन, मुंबई या संस्थेमध्ये शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमात केंद्रीभुत (CAP) व संस्थास्तरावरील प्रवेश प्रक्रियेतुन प्रवेश घेतलेल्या प्रथम व थेट व्दित्तीय वर्षातील प्रवेशीत विद्यार्थ्यांना इतर विनाअनुदानीत महाविद्यालयात स्थलांतर करण्याचे अनुषंगाने दि.२९/०९/२०१६ व दि.३०/०९/२०१६ रोजी शासकीय तंत्रनिकेतन,बांद्रा,मुंबई येथे संबधित विद्यार्थ्यांनी उपस्थित रहाण्याबाबत सूचना देवून विकल्प सादर करणेचे सुचित करण्यात आले होते. सर्व संबधित विद्यार्थ्यांनी दि.२९.०९.२०१६ व दि.३०.०९.२०१६ रोजी शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई, बांद्रा येथे प्रत्यक्ष उपस्थित राहून विकल्प सादर केलेले आहेत सदर सादर केलेले विकल्पानुसार, उपलब्ध जागा व विद्यार्थ्याच्या गुणवत्ते नुसार या आदेशा सोबत जोडलेल्या यादी प्रमाणे विद्यार्थ्याचे त्यांच्या नावासमोर नमुद केलेल्या संस्थेमध्ये खालील अटी व शर्तीनुसार संस्था स्थलांतर करण्यात येत आहे.

१. स्थलांतरीत केलेल्या संस्थेचे लागू असलेले शैक्षणिक शुल्क नियमानुसार संबधित विद्यार्थ्यांनी भरणे बंधनकारक राहील.
२. विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती मिळत असल्यास यापुढेही स्थलांतरीत केलेल्या संस्थेमध्ये सुरु राहतील (मागास वर्गीय विद्यार्थ्री, टी.एफ.डब्ल्यु.एस. अंतर्गत व इतर)

३. पदमभूषण वसंतदादा पाटील प्रतिष्ठांनचे कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, सायन, मुंबई यांनी विद्यार्थ्यांनी त्यांचे संस्थेमध्ये अदा केलेले शिक्षण व इतर शुल्क संबधित विद्यार्थ्यांना परत करावे.

४. पदमभुषण वसंतदादा पाटील प्रतिष्ठानचे कॉलेज ऑफ इंजिनियरिंग, सायन, मुंबई यांनी त्यांचे संस्थेत शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये प्रवेशित विद्याथ्याचे सर्व मुळ कागदपत्रे नव्याने संस्थाबदलाने प्रवेश दिलेल्या संस्थेमध्ये सादर करणेसाठी संबधित विद्यार्थ्यांना तात्काळ परत करावीत.

५. सर्व विद्यार्थ्यांनी स्थलांतरणाने बदल करण्यात आलेल्या त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या संस्थेमध्ये तात्काळ प्रवेश घ्यावा.

६. विद्यार्थ्याची प्रवेशा संबधिची संपूर्ण कागदपत्रे तपासून स्थलांतरीत केलेल्या संस्थेने विद्यार्थ्याचे प्रवेश निश्चित करावेत व सदर विद्यार्थ्याची संस्थेतील एकत्रित यादी मान्यतेसाठी या कार्यालयास सादर करावी.

(प्रमोद अ.नाईक)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

प्रत:-

१. मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांना माहिती करीता सादर
२. मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई
३. मा.आयुक्त, प्रवेश नियामक प्राधिकरण, रुम नं.३०५, ३ रा मजला, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९ खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, बांद्रा (पुर्व) मुंबई ४०० ०५१
४. मा.अध्यक्ष, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली,
५. संचालक व रिजनल ऑफीसर, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद पश्चिमी क्षेत्रिय कार्यालय, मुंबई
६. मा. सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, रुम नं.३०५, ३ रा मजला, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९ खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, बांद्रा (पुर्व) मुंबई ४०० ०५१.
७. मा. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई यांना माहिती करीता सादर.
८. मा. परिक्षा नियंत्रक, मुंबई विद्यापीठ, महात्मा फुले भवन, विद्यानगरी कलीना, सांताक्रुझ (पुर्व) मुंबई यांना माहिती करीता.
९. प्राचार्य,पदमभुषण वसंतदादा पाटील प्रतिष्ठानचे अभियांत्रिकी महाविद्यालय, सायन यांना कळविण्यात येते की, त्यांनी वरील अनुक्रमांक ३ व ४ मध्ये नमुद केलेनुसार तात्काळ कार्यवाही करावी.
१०.संबधित विद्यार्थी (सहसंचालकांच्या www.jdteromumbai.com संकेतस्थळावर उपलब्ध )
११.प्राचार्य,संबधित स्थलांतरीत करण्यात आलेल्या संस्थेस माहिती व पुढील कार्यवाही साठी